# सुनंदा

माझ्या मुंबईच्या मैत्रिणीला पणजीत एक ब्लॉक घ्यायचा होता. तिच्या अटी जरा विचित्रच होत्या. तिचे बजेट मोठे नव्हते तरी मिरामार जवळ, मार्केट फार लांब नको, आडवाटेला नको, अपार्टमेंट नको, मुंबईसारखी सोसायटी हवी, दुसरा मजला नको, पहिला फार तर तळमजला चालेल. इत्यादी इत्यादी. तिच्या ब्लॉक संशोधनाला मी कंटाळून गेले होते. एक दिवस तिचा फोन आला. मी ब्लॉक घ्यायचा ठरवला आहे. तू तिथे जरा येऊन जा. मी तिने सांगितलेल्या ठिकाणी गेले. लहानशी सोसायटी, आटोपशीर ब्लॉक, लोकेशन साधारण तिला हवे तसे तेव्हा मी पण खूश झाले. माझ्या मैत्रिणीने ओळख करून दिली. 'ही सुनंदा! ब्लॉकची मालकीण.' मी तिला हॅलो म्हटले. 'मला यापेक्षा २०-३० हजार जास्त मिळत होते, पण ह्या आमच्याच बँकेतून लोन काढून ब्लॉक घेताहेत म्हणून मी यांनाच हो म्हटले.' तिने मला सांगितले. ब्लॉक विकून आपण तुमच्यावर उपकार करतो आहोत असे दाखवण्याचा एक प्रकार असे समजून मी तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले. आजच्या जगात स्वतःचा तोटा करून कोण महात्मा दुसऱ्याचा फायदा करून देणार? अशी ही माझी व सुनंदाची पहिली भेट. त्यानंतर मी तिला विसरूनही गेले. मैत्रिणीने खरेदीचे सोपस्कार आटोपले. ब्लॉकला रंगरंगोटी केली व ती मुंबईला गेली. मग अधूनमधून दोनचार महिन्यांनी ती त्या ब्लॉकवर येऊन राहत असे. मी पण तिच्याकडे जाई, पण सुनंदाचा विषय कधी निघाला नाही.

या गोष्टीला सातआठ महिने झाले असतील. एकदा मी माझ्या मुलीच्या कॉलेजात तिच्याबरोबर गेले. त्यांची ट्रीप जाणार होती तेव्हा तिथे राहायची व्यवस्था काय, बरोबर कोण-कोण टीचर्स जाणार इत्यादी गोष्टींची माहिती घ्यावी हा उद्देश! आम्ही तिथे बसलो. तिथे ही सुनंदा तिच्या मुलीला सोडायला आली होती. तिनेच मला हटकले. नाहीतर मी तिला ओळखलेच नसते. 'आवडला ना ब्लॉक तुमच्या मैत्रिणीला?' तिने विचारले. मी म्हणाले,

'हो खूश आहे. येत असते अधूनमधून.' 'तुम्ही कुठे राहता आता?' मी तिला विचारले. 'इथे जवळच वन रूम किचन मिळाली आहे. दुसरी शोधते आहे' असे म्हणून ती माझ्या जवळच बसली.

मी तिच्याकडे पाहिले. सरळ साधा चेहरा, शांत हसणे, साधे कपडे, चेहऱ्यावर कसलीही रंगरंगोटी नाही, केसाची जाड लांब वेणी, तिचा साधेपणा मला फार भावला- ही एका मोठ्या बँकेत ऑफिसर आहे असे वाटणारच नाही वेळ खूप होता. आणखी बोलायला कोण नव्हते म्हणून मी सहज तिला विचारले की तिला मुले किती? ती म्हणाली, हिच्यापेक्षा दोन वर्षांनी मोठा मुलगा आहे. 'मग तुम्हाला ही जागा छोटी पडत असेल. तुम्ही तुमचा ब्लॉक का विकलात?' माझ्या तोंडून प्रश्न गेला व मलाच कसेतरी वाटले. पण कसे कोण जाणे तिला माझ्याबद्दल आपलेपणा वाटला व ती पटकन म्हणाली, मोठी कहाणी आहे ती! माझ्या आयुष्याच्या लढाईची! हार-जीत ठरायची आहे, पण मी हार कधीच मानत नाही. तिचा चेहरा कसनुसा झाला. मी म्हटले, आय ॲम सॉरी. मी तुम्हाला दुखवले, पण शक्य असेल तर मन मोकळे करा. त्यामुळे तुम्हालाच बरे वाटेल. तिला माझ्या बोलण्यात एक आश्वासकता जाणवली. ती सांगू लागली, 'लहानपणापासून माझ्या नशिबात सुखाचे प्रमाण व्यस्तच आहे. आता मला त्याची सवयच झाली आहे.'

ती दोन वर्षांची असताना तिची आई वारली. घरात दुसरे कोणी नव्हते. मावशीने आपल्या घरी नेले. वर्षभर ठेवले. इथे वडिलांनी दुसरे लग्न केले. मावशी गरोदर राहिली तेव्हा तिने हिला वडिलांकडे आणून सोडले. सावत्र आईला ही नकोच होती, पण करणार काय. तिने हिला कधी प्रेमाने वागवलेच नाही, उलट जरा मोठी झाल्यावर तिच्या मुलांची उस्तवारी हिलाच करावी लागायची. मावशी मधूनमधून हिला आपल्या घरी नेत असे तेच बाळपणीचे सुखाचे दिवस. मावशीने एक गोष्ट मात्र हिच्या मनावर पक्की बिंबवली होती. तू तुझे शिक्षण चांगले पूर्ण करून तुझ्या पायावर उभी राहा. तुला दुसऱ्या कुणाचा आधार नाही. कारण वडीलही अगदी जोरूचा गुलाम झाले होते. ही मुळातच हुशार, त्यामुळे शेवटपर्यंत स्कॉलरशिपवर शिकली. बी.ए.ला इकॉनॉमिक्स घेऊन फर्स्ट क्लास आली व बँकेत नोकरीला लागली. त्याच अवधीत तिला संदीप भेटला. त्याला हिची घरची परिस्थिती माहीत होती. त्याला हिचे मनापासून कौतुक वाटे. तो नेहमी तिच्याशी कौतुकाने, प्रेमाने बोले. बाहेरच्या कामात मदत करी. प्रेमाची भुकेली त्याच्या प्रेमात पडली. तो डिप्लोमा इंजिनीअर. एका चांगल्या कंपनीत नोकरीला होता.

पगारही चांगला होता. त्यांच्या कुटुंबात तोच शिकलेला होता. बाकीचे भाऊ घरची शेती बघत. ही कऱ्हाडे ब्राह्मण व तो मराठा पण प्रेमात ही बंधने आड येत नाहीत. मावशीने सांगितले, वडील किंवा आई तुझे लग्न करून देणार नाहीत. आई तर तुझ्या पैशावर डोळा ठेवून आपल्या मुलीसाठी वरसंशोधन करायला तयार झाली आहे. तेव्हा तू तुझे लग्न रजिस्टर पद्धतीने उरकून घे. माझा तुला पूर्ण पाठिंबा आहे. आशीर्वाद आहे. लग्नानंतरचे दिवस सुखाने मंतरलेले होते. त्याचे घर चिमूलला होते. त्याचे दोन मोठे भाऊ, आई असे कुटुंब होते. भावाची लग्ने झालेली होती. त्यांची बिऱ्हाडे होती. याच्याबरोबर त्याची आई राहत होती. आई अतिशय प्रेमळ होती. तिला ही सून फार आवडली होती. एवढी शिकलेली ब्राह्मणाची पोर आपली सून म्हणून तिला अप्रूप होते. ती तिचे अतिशय लाड करी. सुरुवातीला तिने नॉनव्हेज खाण्याचा प्रयत्न केला, पण तिला जमले नाही. पण आईने कधी बळजबरी केली नाही. तिच्या आवडीचे साधे पदार्थ ती मुद्दाम तिच्यासाठी करी. सुनंदाला कामाचा उरक उत्तम होता. ती घरातले सर्व आवरून ऑफिसला जाई. अशी दहा वर्षे गेली. दोन मुले झाली. त्यांच्या शिक्षणाकडेही तिचे लक्ष असे. तो मेकॅनिकल डिप्लोमा इंजिनीअर होता. एका चांगल्या कंपनीत कामाला होता. त्याची प्रगती स्लो होती, पण त्याबद्दल हिचे काहीच म्हणणे नव्हते.

आई वारल्यानंतर नवऱ्याच्या वागण्यात बदल होऊ लागला. भाऊ, वहिन्या उपरोधिक बोलत. बामणाची बाईल ती तुझ्या डोक्यावर बसणार. आमच्या बायका आमच्या ताब्यात असे काहीतरी मनात भरवून देत. आई असेपर्यंत असल्या गोष्टींना थारा नव्हता. हिला जरा नाटक, साहित्याची आवड. संगीताचा कार्यक्रम ऐकायला आवडे. त्याला आग्रह करून ती सुरुवातीला घेऊन जात असे, पण तो तिथे कंटाळत असे. शेवटी तिने त्याचा नाद सोडला. मग ती एकटीच जायची. मग वहिन्या काहीतरी बोलायच्या. याच्या मनात संशय उत्पन्न व्हायचा. ती घरी आली की तिला बोलायचा अशा वेळी त्याने दोनचार पेगही मारलेले असायचे. तरीही ती शांत असायची.

तसे चिमूलहून पणजीला बँकेत यायला तिला लांब पडायचे. आता सासूपण नव्हती. मुले सातवी व नववीत शिकत होती. तिने बँकेतून लोन काढून पणजीत ब्लॉक घेतला व ती सर्व इथे शिफ्ट झाली. मुलांना चांगल्या शाळेत ॲडमिशन मिळाली. इथे सर्व उच्चशिक्षित लोक होते. मुलांना पण चांगली संगत मिळाली. तिने घरासाठी लोन काढले. घर सजवले. त्याने काही विशेष खर्च केला नाही, पण तिला त्याचे व तिचे असे वेगळेपण

नव्हते. ब्लॉक नवऱ्याच्या नावावर सोसायटीत रजिस्टर केला. नवरा खूश झाला. सर्व ठीक चालले होते.

भाऊ, वहिन्या येऊन नवीन घर पाहून गेल्या. त्यानंतर हा घरी जाऊन कधीतरी नारळ वगैरे घेऊन येत असे. पण असा घरी जाऊन आला की बिथरलेला दिसे. ती कधी नाटकाला किंवा गाण्याच्या कार्यक्रमाला गेली की तो तिला नाना संशय घेऊन त्रास देई. ती त्याला समजावे, पण हल्ली हे फारच होऊ लागले. त्याला एक प्रकारची न्यूनगंडाची भावना घेरू लागली. तिने त्याला पुष्कळ सावरायचा प्रयत्न केला. तो कधी कधी तिच्यावर हात टाकी, पण चार भिंतीआड किंवा बेडरूममध्ये. मुलांच्या समोर हे कधी होत नसे. ती अशी काळजी घेई. मुले आता मोठी झाली. कॉलेजात जाऊ लागली. त्यामुळे ती झोपायला गेल्याशिवाय आपले दार बंद करणे तिला योग्य वाटत नसे, पण त्याबाबतही त्याची दादागिरी चाले. ती तिला खटके, पण ती सर्व सांभाळून घेत होती. मी आंतरजातीय विवाह माझ्या मर्जीने केला. मग तो मी निभावून नेईन अशी तिची जिद्द होती, पण तिला त्याचे सहकार्यच कमी पडले आणि एक दिवस कळसच झाला. ती नाटकाहून परत आली तर हा दारातच तिला ओरडत सुटला. कोणत्या याराबरोबर एवढा वेळ होतीस. त्याने तिला लाथ मारून हाकलून दिले. घरातच घेतले नाही. मुलगी जागीच होती. तिच्या समोरच हा प्रकार झाला. मुलीलाही वडिलांचा राग आला, कारण आपली आई कशी आहे हे तिला माहीत होते. त्याने दार लावले. रात्री ही जाणार कुठे? तिने शेजारचे दार ठोठावले. ती शेजारीण तिची चांगली मैत्रीण होती. एक रात्र तिच्याकडे काढून दुसऱ्या दिवशी तो ऑफिसला गेल्यावर ती घरी आली. तिने निश्चय केला, आता याचे ऐकून घ्यायचे नाही. तिने त्याला मुलासमोर रात्री विचारले, तुझा माझ्यावर विश्वास नाही तर एकत्र राहण्यात अर्थ नाही. तू तुझ्या घरी जाऊन राहा. मी मुलांना घेऊन इथे राहते, पण तो जागा सोडायला तयार नव्हता. त्याला वाटले ही जाणार कुठे? पण तिने आता निश्चय केला होता. जगणार ते मानाने. मार खाऊन नाही. तिने एक छोटी दीड खोलीची जागा बघितली व आपले जरुरीचे सामान घेऊन ती तिथे गेली. मुलेही तिच्याबरोबरच आली. नंतर तिने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन ब्लॉक विकायला काढला, कारण ब्लॉकसाठी पैसे तिच्या पगारातून जात होते व ब्लॉक त्याच्या नावावर होता. माझ्या मैत्रिणीने तिच्याच बँकेतून लोन घेतले त्यामुळे तिचे लोन फिटून उरलेले पैसे कॅश मिळाले. त्यातला अर्धा वाटा त्याने हक्काने वसूल केला. सर्वच कॅश

घेतले असते तर त्यातले अर्धे त्याने घेतले असते व हिचे लोन हिच्या डोक्यावर तसेच राहिले असते.

आता मनात शांती आहे. मुले चांगली शिकताहेत. त्यांच्यासाठी खर्च करायलाच पाहिजे म्हणून आणखी पार्टटाइम उद्योग करत असते. ट्यूशन घेते. त्यामुळे भरीला पैसे मिळतात. मुलाला इंजिनीअरिंगला घातला आहे. मुलगी कॉमर्सला आहे. तिला खेळात इंटरेस्ट आहे. त्यांना पाहिजे त्याप्रमाणे प्रगती करायला वाव आहे. तो आपल्या चिमूलच्या घरी राहतो. त्याला एवढे मुलांचे प्रेम होते, पण आता त्यांच्या वाढदिवसाला पण फोन करत नाही. हिने मुलांना आपल्या वडिलांना भेटावेसे वाटले तर अवश्य जा असे सांगून ठेवले आहे. त्याचे भाऊ, वहिनी व त्यांची मुले यांनी त्याला आपल्यातला केला आहे. त्याच्या मुलांसाठी आईला अधिक कष्ट करून पैसे जमवावे लागत आहेत आणि तो त्याचे पैसे आपल्या पुतण्या, वहिन्या, भाऊ यांच्यावर उधळतो आहे, पण हिला त्याबद्दल दुःख नाही. ती म्हणते जातीबाहेर लग्न करूनही मी यशस्वी होऊन दाखवणार होते ते जमले नाही. म्हणून मला वाईट वाटते. बाकी काही नाही. मी सबंध दिवस बिझी असते. माझी मुले माझ्याजवळ आहेत. त्यांना मार्गी लावणे हेच माझे ध्येय.

मी म्हटले, आणिक चार वर्षांत मुले आपापल्या मार्गाने जातील. तुझी तोपर्यंत साठी पण येणार नाही. या अर्ध्या वयात तू एकटी पडशील. ती म्हणाली, समजा अचानक वैधव्य आले तर कोणाला बोल देऊ शकतो? मला माझे खूप छंद आहेत. ते जोपासण्यात माझा वेळ सहज जाईल पण त्याचे काय? त्याची माया संपली की त्याच्या आप्तेष्टांची माया आटेल. मग मात्र तो अगदी एकटा पडेल. त्याचेच मला वाईट वाटते. ज्यावेळी मला गरज होती त्यावेळी त्याने मला भरभरून प्रेम दिले. त्याच्या आईने मला आईची माया दिली. ते उपकार मी कसे विसरू? मी आता घटस्फोटासाठी अर्ज केलाय. कारण घटस्फोटानंतर माझ्या घरावर त्याचा हक्क राहणार नाही. मला कुठेतरी मोठा ब्लॉक घेता येईल. पण जर तो कधी परत आला तर माझ्या घरात त्याला निश्चित प्रेमाचा कोपरा मिळेल. मला खरेच त्या शांत चेहऱ्यामागचा मनाचा मोठेपणा भावला.

(सारस्वत चैतन्य-त्रैमासिक, जाने-मार्च २००६)